भारत सरकार

बैठकीसाठी

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# विदेश व्यापार (विकास व विनियमन) अधिनियम, १९९२

**(सन १९९२ चा अधिनियम क्रमांक २२)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Foreign Trade (Development and Regulation) Act, 1992

**(Act No. 22 of 1992)**

[ *As in force on the 6th August, 2006* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

[किंमत : रुपये २२.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि फॉरेन ट्रेड (डेव्हलपमेन्ट अ‍ॅण्ड रेग्युलेशन) अ‍ॅक्ट, १९९२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ यात पृष्ठ १२९ ते १३४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर, २००६.

**टी. के. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Foreign Trade (Development and Regulation) Act, 1992 as on the 6th August 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November 2006 on Pages 129 to 134.

This authoritative text was published under the authority of the president under section 2, clause (*a*) of the Authoritative texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 9th November, 2006.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# विदेश व्यापार (विकास व विनियमन) अधिनियम, १९९२

## कलमांचा क्रम

प्रकरण एक

**प्रारंभिक**

कलमे


१. संक्षिप्त नाव व प्रारंभ

२. व्याख्या

प्रकरण दोन

**केंद्र सरकारचा आदेश देण्याचा व आयात-निर्यात धोरण जाहीर करण्याचा अधिकार**

३. आयात आणि निर्यातीच्या संबंधात तरतुदी करण्याचा अधिकार

४. विवक्षित आदेश अंमलात असण्याचे चालू राहणे

५. आयात आणि निर्यात विषयक धोरण

६. महासंचालकाची नियुक्ती व त्याची कार्ये

प्रकरण तीन

**आयातक-निर्यातक संकेतांक आणि लायसन**

७. आयातक-निर्यातक संकेतांक

८. आयातक-निर्यातक संकेतांक तहकूब व रद्द करणे

९. लायसन देणे, तहकूब करणे किंवा रद्द करणे

प्रकरण चार

**झडती, सक्तीने ताब्यात घेणे, शास्ती आणि जप्ती**

१०. झडती आणि सक्तीने ताब्यात घेण्याशी संबंधित अधिकार

११. या अधिनियमाच्या तरतुदी, नियम, आदेश व आयात आणि निर्यात विषयक धोरण यांचे उल्लंघन

१२. शास्ती किंवा जप्ती यांमुळे इतर शिक्षांमध्ये हस्तक्षेप न होणे

१३. अभिनिर्णय प्राधिकारी

१४. मालाचा मालक, इत्यादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे

प्रकरण पाच

**अपील आणि पुनरीक्षण**

१५. अपील

१६. पुनरीक्षण

१७. अभिनिर्णय करणाऱ्या आणि इतर प्राधिकरणांचे अधिकार

प्रकरण सहा

**संकीर्ण**

१८. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

१९. नियम करण्याचा अधिकार

२०. निरसन व व्यावृत्ती

**शब्दसूची** : इंग्रजी-मराठी

मराठी- इंग्रजी

# विदेश व्यापार (विकास व विनियमन) अधिनियम, १९९२

## (१९९२ चा अधिनियम क्रमांक २२)

(६ ऑगस्ट २००६ रोजी यथाविद्यमान)

[७ ऑगस्ट, १९९२]

**भारतात होणारी आयात सुकर करून आणि भारताकडून होणाऱ्या निर्यातीत वाढ करून विदेश व्यापाराचा विकास व त्याचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या त्रेचाळिसाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, "विदेश व्यापार (विकास व विनियमन) अधिनियम, १९९२" असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) कलमे ११ ते १४ ताबडतोब अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी १९ जून, १९९२ रोजी अंमलात आल्या असल्याचे मानण्यात येईल.

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "अभिनिर्णय प्राधिकारी" याचा अर्थ, कलम १३ मध्ये किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट केलेला प्राधिकारी, असा आहे ;

(ख) "अपील प्राधिकरण" याचा अर्थ, कलम १५ च्या पोटकलम (१) मध्ये किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(ग) "वाहन" याचा अर्थ, कोणतेही वाहन, जलयान, विमान किंवा वाहतुकीचे प्राण्यासहित इतर कोणतेही साधन, असा आहे ;

(घ) "महासंचालक" याचा अर्थ, कलम ६ अन्वये नियुक्त केलेला विदेश व्यापार महासंचालक, असा आहे ;

(ङ) "आयात" आणि "निर्यात" याचा अनुक्रमे अर्थ, भारतात जमिनीवरून, समुद्रमार्गे किंवा हवाईमार्गे माल आणणे किंवा तो भारताबाहेर नेणे, असा आहे ;

(च) "आयातक-निर्यातक संकेतांक" याचा अर्थ, कलम ७ अन्वये दिलेला संकेतांक, असा आहे ;

(छ) "लायसन" याचा अर्थ, आयात किंवा निर्यात करण्यासाठी आवश्यक असलेले लायसन, असा आहे आणि त्यात, सीमाशुल्क निपटारा परवाना आणि या अधिनियमाखाली निर्गमित केलेली किंवा दिलेली इतर कोणतीही परवानगी यांचा समावेश होतो ;

(ज) "आदेश" याचा अर्थ, कलम ३ अन्वये केंद्र सरकारने दिलेला कोणताही आदेश, असा आहे ; आणि

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

### प्रकरण दोन

### केंद्र सरकारचा आदेश देण्याचा व आयात-निर्यात धोरण जाहीर करण्याचा अधिकार

**३.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, आयात सुकर करून आणि निर्यातीत वाढ करून विदेश व्यापाराचा विकास व विनियमन करण्यासाठी तरतूद करता येईल. **आयात आणि निर्यातीच्या संबंधात तरतुदी करण्याचा अधिकार.**

(२) केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, सर्व प्रकरणी किंवा विनिर्दिष्ट प्रकरणांच्या वर्गासाठी आणि आदेशाद्वारे किंवा त्याअन्वये करण्यात येतील अशा अपवादांच्या, कोणतेही असल्यास ; अधीनतेने मालाच्या आयात-निर्यातीस प्रतिबंध करण्यासाठी, त्यावर निर्बंध घालण्यासाठी किंवा अन्यथा विनियमन करण्यासाठी तरतूद करता येईल.

(३) पोटकलम (२) खालील कोणताही आदेश ज्या मालाला लागू होतो तो सर्व माल, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) च्या कलम ११ अन्वये आयात किंवा निर्यात करण्यास प्रतिबंध असलेला माल असल्याचे मानण्यात येईल आणि त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी त्यानुसार परिणामक होतील.

विवक्षित आदेश अंमलात असण्याचे चालू राहणे.

४. आयात व निर्यात (नियंत्रण) अधिनियम, १९४७ (१९४७ चा १८) खाली केलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अंमलात असलेले सर्व आदेश, या अधिनियमाच्या तरतुदीं लगतपूर्वी जेथवर विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि ते या अधिनियमाखाली केले असल्याचे मानण्यात येईल.

आयात आणि निर्यात विषयक धोरण.

५. केंद्र सरकार, वेळोवेळी आपले आयात आणि निर्यातविषयक धोरण तयार करील आणि **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ते जाहीर करील. तसेच, त्याच रीतीने त्या धोरणात सुधारणा करील.

महासंचालकाची नियुक्ती व त्याची कार्ये.

६. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी एखाद्या व्यक्तीची विदेश व्यापार महासंचालक म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) महासंचालक, आयात आणि निर्यातविषयक धोरण तयार करण्याबाबत केंद्र सरकारला सल्ला देईल आणि ते धोरण राबविण्यासाठी जबाबदार असेल.

(३) केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, या अधिनियमान्वये त्याला वापरता येण्यासारखे कोणतेही अधिकार (कलमे ३, ५, १५, १६ आणि १९ या खालील अधिकारांव्यतिरिक्त) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रकरणी व अशा शर्तींच्या अधीनतेने, महासंचालकाला किंवा महासंचालकाला दुय्यम असलेल्या अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याला वापरता येतील.

प्रकरण तीन

## आयातक-निर्यातक संकेतांक आणि लायसन

आयातक-निर्यातक संकेतांक.

७. कोणत्याही व्यक्तीला, महासंचालकाने किंवा याबाबतीत महासंचालकाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने, महासंचालकाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार आयातक-निर्यातक संकेतांक दिल्याशिवाय कोणतीही आयात किंवा निर्यात करता येणार नाही.

आयातक-निर्यातक संकेतांक तहकूब व रद्द करणे.

८. (१) जेव्हा—

(क) एखाद्या व्यक्तीने केंद्रीय उत्पादन शुल्क किंवा सीमाशुल्क किंवा विदेशी चलनाशी संबंधित कोणत्याही कायद्याचे उल्लंघन केले असेल किंवा **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे केंद्र सरकारने विनिर्दिष्ट केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये इतर कोणत्याही आर्थिक अपराध केला असेल तेव्हा; किंवा

(ख) भारताच्या कोणत्याही देशाबरोबर असलेल्या व्यापारविषयक संबंधाना किंवा आयात अथवा निर्यातीत गुंतलेल्या इतर व्यक्तींच्या हितसंबंधांना गंभीररीत्या बाधक ठरेल अशा रीतीने एखाद्या व्यक्तीने आयात किंवा निर्यात केली आहे किंवा देशाच्या प्रतिष्ठेबाबत अथवा मालाबाबत दुर्लोकिक निर्माण केला आहे असे मानण्यास महासंचालक सबळ कारण असेल तेव्हा;

महासंचालक, त्या व्यक्तीकडून अभिलेख किंवा इतर कोणतीही माहिती मागवील आणि तिचा आयातक-निर्यातक संकेतांक कोणत्या आधारावर तहकूब किंवा रद्द करण्यात येत आहे, याबाबतची लेखी नोटीस दिल्यानंतर, आणि नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी कालावधीत लेखी अभिवेदन करण्याची तिला पुरेशी संधी दिल्यानंतर आणि तिची इच्छा असल्यास तिचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी त्या व्यक्तीला दिलेला आयातक-निर्यातक संकेतांक तहकूब किंवा रद्द करील.

(२) जेव्हा एखाद्या व्यक्तीला दिलेला कोणताही आयातक-निर्यातक संकेतांक पोटकलम (१) अन्वये तहकूब किंवा रद्द केला जाईल तेव्हा, ती व्यक्ती, महासंचालकाने तिला विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींना अधीन राहून दिलेल्या विशेष लायसनद्वारे असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही मालाची आयात किंवा निर्यात करण्यास हक्कदार नसेल.

**९.** (१) केंद्र सरकारला, विहित करण्यात येईल अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही लायसनबाबत किंवा त्याच्या केलेल्या नवीकरणाबाबत किंवा लायसन मिळविण्याकरिता अर्ज करणाऱ्या अशा व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाच्या संबंधातील अशा अपवादांना अधीन राहून, फी आकारता येईल. **लायसन देणे, तहकूब करणे किंवा रद्द करणे.**

(२) महासंचालक किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, एखाद्या व्यक्तीने अर्ज केल्यावरून आणि त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, विहित करण्यात येईल अशा वर्गातील किंवा वर्गांमधील मालाची आयात किंवा निर्यात करण्यासाठी लायसन देईल किंवा त्याचे नवीकरण करील अथवा ते देण्याचे किंवा त्याचे नवीकरण करण्याचे नाकारील आणि ते नाकारण्याबाबतची कारणे लेखी नमूद करील.

(३) या कलमाखाली दिलेले किंवा नवीकरण केलेले लायसन,—

(क) विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल ;

(ख) त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी ते विधिग्राह्य असेल ; आणि

(ग) विहित करण्यात येतील अशा अटी, व शर्ती व निर्बंधांच्या अधीन असेल किंवा लायसनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा विहित अटी, शर्ती व निर्बंधांच्या अधीन असेल.

(४) महासंचालक किंवा पोटकलम (२) अन्वये प्राधिकृत केलेला अधिकारी, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, लेखी नमूद करण्यात येतील अशा पुरेशा व सबळ कारणास्तव, या अधिनियमान्वये दिलेले कोणतेही लायसन तहकूब करू शकेल किंवा रद्द करू शकेल :

परंतु, लायसनधारकास आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिल्याशिवाय असे कोणतेही लायसन तहकूब किंवा रद्द करता येणार नाही.

(५) लायसन देणे किंवा त्याचे नवीकरण करणे किंवा ते तहकूब अथवा रद्द करणे यास नकार देणाऱ्या आदेशाविरुद्ध केलेले अपील, कलम १५ खाली आदेशाविरुद्ध करावयाच्या अपिलासारख्याच रीतीने अपील दाखल करता येईल.

## प्रकरण चार

## झडती, सक्तीने ताब्यात घेणे, शास्ती आणि जप्ती

**१०.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विहित करण्यात येतील अशा आवश्यकता व शर्ती यांना अधीन राहून, एखाद्या जागेत प्रवेश करून तिथे झडती घेण्याविषयीच्या, तपासणी करण्याविषयीच्या व असा माल, दस्तऐवज, वस्तू आणि वाहने सक्तीने ताब्यात घेण्याविषयीच्या अशा अधिकारांचा वापर करण्याच्या प्रयोजनांसाठी, कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करू शकेल. **झडती आणि सक्तीने ताब्यात घेण्याशी संबंधित अधिकार.**

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या झडती व सक्तीने ताब्यात घेण्याबाबतच्या तरतुदी, या कलमाखाली केलेल्या प्रत्येक झडतीला व ताब्यात घेण्याला, शक्य तेथवर लागू होतील.

**११.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी, त्याखाली केलेले नियम व आदेश आणि त्या वेळी अंमलात असलेले आयात आणि निर्यात विषयक धोरण यांना अनुसरून असेल त्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीला आयात किंवा निर्यात करता येणार नाही. **या अधिनियमाच्या तरतुदी, नियम, आदेश व आयात आणि निर्यात विषयक धोरण यांचे उल्लंघन.**

(२) या अधिनियमातील तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे किंवा आदेशांचे किंवा आयात आणि निर्यात विषयक धोरणाचे उल्लंघन करून, जेव्हा कोणतीही व्यक्ती आयात किंवा निर्यात करील किंवा करण्याचा प्रयत्न करील किंवा त्यास प्रोत्साहन देईल तेव्हा, ती व्यक्ती, एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या किंवा ज्या मालाबाबत कोणतेही उल्लंघन झाले आहे किंवा तसा प्रयत्न करण्यात आला असेल त्या मालाच्या मूल्याच्या पाचपट, यांपैकी जे अधिक असेल इतक्या दंडास पात्र असेल.

(३) जेव्हा एखाद्या व्यक्तीने अभिनिर्णय प्राधिकाऱ्याने तिला नोटीस दिल्यानंतर कोणतेही उल्लंघन केल्याचे कबूल केले असेल तेव्हा, अभिनिर्णय प्राधिकारी, अशा प्रकरणांच्या वर्गासाठी किंवा वर्गांसाठी आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने, तडजोड, म्हणून त्या व्यक्तीने प्रदान करावयाची रक्कम ठरवील.

(४) या अधिनियमान्वये लादलेल्या दंडाची रक्कम जर प्रदान केली नाही तर, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून ती वसूल करण्यात येईल आणि त्या व्यक्तीने दंडाची रक्कम भरण्यात कसूर केली तर, तो दंड भरेपर्यंत अभिनिर्णय प्राधिकाऱ्याद्वारे संबंधित व्यक्तीचा आयातक-निर्यातक संकेतांक तहकूब करण्यात येईल.

(५) जर या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा आदेश किंवा आयात आणि निर्यात धोरण यांचे उल्लंघन करण्यात आले असेल, करण्यात येत असेल किंवा करण्याचा प्रयत्न केला असेल तर, तो माल, तसेच त्याचे कोणतेही पुडके किंवा वेष्टन किंवा पात्र आणि कोणतेही वाहन, विहित करण्यात येतील अशा आवश्यकतांच्या व शर्तींच्या अधीनतेने, अभिनिर्णय प्राधिकाऱ्याद्वारे जप्त केले जाण्यास पात्र असेल.

(६) पोटकलम (५) अन्वये जप्त केलेला माल किंवा वाहन, अभिनिर्णय प्राधिकाऱ्यास, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्तींच्या अधीनतेने, संबंधित व्यक्तीने, त्या मालाच्या किंवा यथास्थिति, वाहनाच्या बाजारभावाच्या सममूल्य इतकी विमोचन आकाराची रक्कम प्रदान केल्यानंतर सोडून देता येईल.

**शास्ती किंवा जप्ती यांमुळे इतर शिक्षांमध्ये हस्तक्षेप न होणे**

**१२.** या अधिनियमान्वये लादलेली शास्ती किंवा केलेली जप्ती यांमुळे, त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये बाधित झालेली व्यक्ती ज्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरत असेल, ती शिक्षा करण्यास प्रतिबंध होणार नाही.

**अभिनिर्णय प्राधिकारी.**

**१३.** महासंचालकास किंवा केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत प्राधिकृत करील अशा इतर अधिकाऱ्यास, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा मर्यादांच्या अधीनतेने, या अधिनियमान्वये कोणतीही शास्ती लादता येईल किंवा कोणतीही जप्ती न्यायनिर्णित करता येईल.

**मालाचा मालक, इत्यादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे.**

**१४.** मालाच्या किंवा वाहनाच्या मालकाला किंवा इतर संबंधित व्यक्तीला पुढील प्रकारची लेखी नोटीस देण्यात आल्याशिवाय, त्याच्यावर शास्ती लादण्याचा किंवा जप्ती अभिनिर्णित करण्याचा कोणताही आदेश देण्यात येणार नाही :—

(क) ज्या आधारावर त्याच्यावर शास्ती लादण्याचे किंवा माल अथवा वाहन जप्त करण्याचे प्रस्तावित करण्यात आले ती कारणे कळवणारी नोटीस ; आणि

(ख) नोटिशीत नमूद केलेली शास्ती किंवा जप्ती याविरूद्ध, त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी वेळेत लेखी निवेदन करण्यास सांगणारी आणि त्याची तशी इच्छा असल्यास, त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यासाठीची नोटीस.

## प्रकरण पाच
## अपील आणि पुनरीक्षण

**अपील.**

**१५.** (१) या अधिनियमान्वये अभिनिर्णय प्राधिकाऱ्याने दिलेला कोणताही निर्णय किंवा आदेश यामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीला, ज्या दिनांकास तिला निर्णय किंवा आदेश देण्यात आला असेल अशा दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत,—

(क) जेव्हा महासंचालकाने तो निर्णय किंवा आदेश दिला असेल तेव्हा केंद्र सरकारकडे;

(ख) जेव्हा महासंचालकाला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याने निर्णय किंवा आदेश दिला असेल तेव्हा, महासंचालकाकडे किंवा महासंचालकाने अपिलाची सुनावणी करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अभिनिर्णय प्राधिकाऱ्याला वरिष्ठ असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे, अपील दाखल करता येईल :

परंतु, उपरोक्त कालावधीत अपील दाखल करू न शकण्यास अपीलकर्त्यास पुरेसे कारण होते याबाबत अपील प्राधिकरणाचे समाधान झाले तर, ते पुढील तीस दिवसांच्या कालावधीत अपील दाखल करण्याची परवानगी देईल :

परंतु आणखी असे की, शास्ती लादण्याच्या किंवा विमोचन आकाराच्या निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्याच्या प्रकरणी, अपीलकर्त्याने शास्तीची किंवा विमोचन आकाराची रक्कम जमा केल्याशिवाय असे कोणतेही अपील स्वीकारले जाणार नाही :

परंतु तसेच, अशी रक्कम भरल्यामुळे अपीलकर्त्यावर अवाजवी बोजा पडेल असे अपील प्राधिकरणाचे मत झाल्यास, ते त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार विनाशर्त किंवा ते लादेल अशा शर्तींच्या अधीनतेने, अशी रक्कम भरण्याची अट काढून टाकील.

(२) अपील प्राधिकरणाला, अपीलकर्त्यास, त्याची इच्छा असेल तर, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटेल अशी, जर कोणती असल्यास, इतर आणखी चौकशी केल्यानंतर, ज्या निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरूद्ध अपील केले असेल असा आदेश किंवा निर्णय त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे कायम करण्याचा, त्यात फेरबदल करण्याचा किंवा उलटा फिरवण्याचा आदेश देता येईल आणि ते प्रकरण, आवश्यक असल्यास अतिरिक्त पुरावा मिळवल्यानंतर त्याला योग्य वाटेल अशा निदेशांसह नवीन अभिनिर्णयासाठी, किंवा, यथास्थिति, निर्णयासाठी परत पाठवता येईल :

परंतु, अपीलकर्त्याला आपले निवेदन करण्याची संधी देण्यात आल्याशिवाय आणि त्याची इच्छा असल्यास त्याचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय शास्तीची रक्कम किंवा विमोचन आकाराची रक्कम वाढविणे किंवा ती लादणे किंवा अधिक मूल्य असलेला माल जप्त करणे यांकरिता या कलमान्वये आदेश देण्यात येणार नाही.

(३) अपील प्राधिकरणाने अपिलात दिलेला आदेश अंतिम असेल.

**पुनरीक्षण.**

**१६.** केंद्र सरकार, अपिलात दिलेला निर्णय किंवा आदेश नसेल अशा, महासंचालकाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाबाबत किंवा आदेशाबाबत, किंवा त्याला दुय्यम असलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाबाबत किंवा आदेशाबाबत महासंचालक, स्वतःहून किंवा अन्यथा, ज्यात शास्ती किंवा विमोचन आकार लादण्याचा किंवा जप्तीचा अभिनिर्णय करण्यात आला असेल आणि ज्याविरुद्ध अपील दाखल करण्यात आलेले नसेल अशा कोणत्याही कार्यवाहीचा अभिलेख मागवून आपली स्वतःची, किंवा त्याची अशा निर्णयाच्या किंवा आदेशाच्या अचूकतेबाबत, वैधतेबाबत किंवा औचित्याबाबत समाधान करून घेण्यासाठी त्याची तपासणी करील आणि त्यावर त्याला योग्य वाटतील असे आदेश देईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीवर बाधक परिणाम होईल अशा रीतीने या कलमाखालील कोणत्याही निर्णयात किंवा आदेशात,—

(क) अशा व्यक्तीस, असा निर्णय किंवा आदेश दिल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत तो निर्णय किंवा आदेश का बदलण्यात येऊ नये याची कारणे दाखवा नोटीस दिल्याशिवाय, आणि

(ख) तिला तिच्या बचावाच्या संदर्भात निवेदन करण्याची व जर तिची इच्छा असल्यास, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय,

कोणताही बदल करण्यात येणार नाही.

**अभिनिर्णय करणाऱ्या आणि इतर प्राधिकरणांचे अधिकार.**

**१७.** (१) या अधिनियमान्वये कोणताही अभिनिर्णय करणाऱ्या किंवा कोणत्याही अपिलाची सुनावणी करणाऱ्या किंवा पुनरीक्षणाचे कोणतेही अधिकार वापरणाऱ्या प्रत्येक प्राधिकरणास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये दिवाणी न्यायालयास एखाद्या वादाची न्यायचौकशी करताना जे अधिकार असतात तेच सर्व अधिकार पुढील बाबतीत असतील :—

(क) साक्षीदारांना समन्स पाठवणे व न्यायालयात उपस्थित राहण्यास भाग पाडणे ;

(ख) कोणतेही दस्तऐवज शोधण्यास व ते सादर करण्यास फर्माविणे ;

(ग) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सरकारी अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे ;

(घ) शपथपत्रावर पुरावा घेणे ; आणि

(ङ) साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे पाठवणे.

(२) या अधिनियमान्वये कोणताही अभिनिर्णय करणारे किंवा कोणत्याही अपिलाची सुनावणी करणारे किंवा पुनरीक्षणाचे कोणतेही अधिकार वापरणारे प्रत्येक प्राधिकरण, भारतीय दंड संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ३४५ आणि ३४६ यांच्या प्रयोजनांसाठी दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

(३) या अधिनियमान्वये कोणताही अभिनिर्णय करणाऱ्या किंवा कोणत्याही अपिलाची सुनावणी करणाऱ्या किंवा पुनरीक्षणाचे कोणतेही अधिकार वापरणाऱ्या प्रत्येक प्राधिकरणास, त्याला योग्य वाटतील असे अंतरिम स्वरूपाचे आदेश देता येतील व तसेच, कोणत्याही निर्णयास किंवा आदेशास पुरेशा कारणास्तव स्थगिती देता येईल.

(४) कोणत्याही निर्णयातील किंवा आदेशातील लेखनाची किंवा आकड्यांची चूक किंवा अनवधानाने झालेल्या कोणत्याही चुकीमूळे किंवा वगणुकीमुळे त्यात उद्भवलेला दोष, तो निर्णय किंवा आदेश देणारे प्राधिकरण, स्वतःहून किंवा कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून दुरुस्त करू शकेलः

परंतु, जेव्हा या पोटकलमाखाली प्रस्तावित करण्यात आलेली कोणताही दुरुस्ती, एखाद्या व्यक्तीवर बाधक परिणाम करीत असेल तेव्हा, या व्यक्तीला त्या प्रकरणी निवेदन करण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय अशी कोणतीही दुरुस्ती करण्यात येणार नाही, आणि असा निर्णय किंवा आदेश दिल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर अशी दुरुस्ती करण्यात येणार नाही.

## प्रकरण सहा
## संकीर्ण

**सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.** **१८.** या अधिनियमान्वये दिलेला किंवा दिल्याचे मानण्यात आलेला कोणताही आदेश, कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करण्यात येणार नाही, आणि या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करावयाचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा त्याखाली दिलेल्या किंवा दिल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशाबद्दल किंवा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.** **१९.** (१) केंद्र सरकारला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ८ च्या पोटकलम (२) अन्वये ज्या रीतीने व ज्या शर्तींना अधीन राहून, विशेष लायसन देण्यात येईल, ती रीत व त्या शर्ती ;

(ख) कलम ९ च्या पोटकलम (१) अन्वये, ज्या अपवादांच्या अधीनतेने आणि ज्या व्यक्तीबाबत किंवा व्यक्तींच्या वर्गाबाबत फी वसूल करण्यात येईल ते अपवाद व त्या व्यक्ती आणि ज्या रीतीने लायसन देण्यात येईल किंवा त्याचे नवीकरण करण्यात येईल ती रीत ;

(ग) कलम ९ च्या पोटकलम (२) अन्वये ज्या मालाच्या वर्गासाठी किंवा वर्गांसाठी लायसन देण्यात येईल तो वर्ग किंवा ते वर्ग ;

(घ) कलम ९ च्या पोटकलम (३) अन्वये ज्या नमुन्यात आणि ज्या अटी, शर्ती व निर्बंधांच्या अधीनतेने लायसन देण्यात येईल तो नमुना व त्या अटी, शर्ती आणि निर्बंध ;

(ङ) कलम ९ च्या पोटकलम (४) अन्वये ज्या शर्तींच्या अधीनतेने लायसन तहकूब करण्यात किंवा रद्द करण्यात येईल त्या शर्ती ;

(च) कलम १० च्या पोटकलम (१) अन्वये ज्यांच्याबाबतीत आणि ज्या आवश्यकता व शर्तींच्या अधीनतेने त्यात प्रवेश करण्याचा, झडती घेण्याचा, तपासणी करण्याचा व ताब्यात घेण्याचा अधिकार वापरता येईल त्या जागा, तो माल, ते दस्तऐवज, त्या वस्तू आणि ती वाहने ;

(छ) कलम ११ च्या पोटकलम (३) अन्वये ज्या प्रकरणाच्या वर्गासाठी किंवा वर्गांसाठी आणि ज्या रीतीने तडजोडीची रक्कम ठरविण्यात येईल ते वर्ग व ती रीत ;

(ज) कलम ११ च्या पोटकलम (५) अन्वये ज्या आवश्यकता व शर्तींच्या अधीनतेने माल व वाहने जप्त करण्यास पात्र ठरतील त्या आवश्यकता व शर्ती ;

(झ) कलम ११ च्या पोटकलम (६) अन्वये, ज्या रीतीने व ज्या शर्तींच्या अधीनतेने, विमोचन आकाराची रक्कम प्रदान केल्यानंतर माल आणि वाहन सोडून देता येईल ती रीत व त्या शर्ती ; आणि

(ञ) विहीत करावयाची किंवा करता येईल किंवा नियमांद्वारे ज्याकरिता तरतूद करावयाची आहे किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) केंद्र सरकारने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम, अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि अशा कोणत्याही अपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**२०.** आयात व निर्यात (नियंत्रण) अधिनियम, १९४७ (१९४७ चा १८) आणि विदेश व्यापार (विकास व विनियमन) अध्यादेश, १९९२ (१९९२ चा अध्यादेश ११) हे याद्वारे निरसित करण्यात येत आहेत. **निरसन व व्यावृत्ती.**

(२) तथापि, आयात व निर्यात (नियंत्रण) अधिनियम, १९४७ (१९४७ चा १८) याच्या निरसनामुळे,—

(क) अशाप्रकारे निरसित केलेल्या अधिनियमाचे आधीचे प्रवर्तन, किंवा त्याखाली, योग्य रीत्या केलेल्या किंवा बाध पोहचलेल्या कोणत्याही बाबी ; किंवा

(ख) अशाप्रकारे निरसित केलेल्या अधिनियमान्वये संपादन केलेले, मिळालेले आणि पत्करलेले कोणतेही हक्क, विशेषाधिकार, आबंधने किंवा दायित्वे ; किंवा

(ग) अशाप्रकारे निरसित केलेल्या अधिनियमान्वये कोणत्याही उल्लंघनाबद्दल झालेली कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा ; किंवा

(घ) उपरोक्तप्रमाणे, असे कोणतेही हक्क, विशेषाधिकार, आबंधने, दायित्व, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यांबाबत केलेली कोणतीही कार्यवाही किंवा उपाययोजना, यांवर परिणाम होणार नाही.

आणि अशी कोणतीही कार्यवाही किंवा उपाययोजना करणे, चालू ठेवणे किंवा अंमलबजावणी करणे आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा, या गोष्टी जणू काही हा अधिनियम निरसित केलाच नव्हता याप्रमाणे करता येतील.

(३) विदेश व्यापार (विकास व विनियमन) अध्यादेश, १९९२ (१९९२ चा अध्यादेश ११) याचे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये केल्याचे मानण्यात येईल.

# THE FOREIGN TRADE (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 2002

## विदेश व्यापार (विकास व विनियमन) अधिनियम, १९९२

### इंग्रजी -मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| Adjudicating Authority | अभिनिर्णय प्राधिकारी | [section 2 (a)] |
| conveyance | वाहन | [section 10 (1)] |
| disrepute | दुर्लोकिक | [section 8 (1) (b)] |
| good and sufficient reason | पुरेसे व सबळ कारण | [section 9 (4)] |
| Importer-exporter code number | आयातक-निर्यातक संकेतांक | [section 2 (f)] |
| modification | आपरिवर्तन | [section 19 (3)] |
| operation | प्रवर्तन | [section 20 (2) (a)] |
| prejudicially affect | बाधक परिणाम | [section16 proviso] |
| receptacle | पात्र | [section 11 (5)] |
| redemption charge | विमोचन आकार | [section 11 (6)] |
| revision | पुनरीक्षण | [section 17 (2)] |

# विदेश व्यापार (विकास व विनियमन) अधिनियम, १९९२

# THE FOREIGN TRADE (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1992

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अभिनिर्णय प्राधिकारी | Adjudicating Authority | [कलम २ (क) ] |
| आपरिवर्तन | modification | [कलम १९ (३)] |
| आयातक-निर्यातक संकेतांक | Importer-exporter code number | [कलम २ (च)] |
| दुर्लोकिक | disrepute | [कलम ८ (१) (ख)] |
| पात्र | receptacle | [कलम ११ (५) ] |
| पुनरीक्षण | revision | [कलम १७ (२)] |
| पुरेसे व सबळ कारण | good and sufficient reason | [कलम ९ (४)] |
| प्रवर्तन | operation | [कलम २० (२) (क] |
| बाधक परिणाम | prejudicially affect | [कलम १६ परंतुक] |
| वाहन | conveyance | [कलम १० (१)] |
| विमोचन आकार | redemption charge | [कलम ११ (६)] |